




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १७१ * नांदेड * रविवार, दि. २८ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# महाराष्ट्रात पुन्हा पेपरफुटीचे सत्र! आज होणारी ‘टीईटी’ परीक्षा स्थगित

## ठाण्यातून पेपर जप्त, भिवंडीतून तिघांना अटक




**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षा आणि पात्रता परीक्षांच्या पेपरफुटीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. आज (रविवारी) होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) पेपर फुटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पेपर लीक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर शिक्षण विभागाने तातडीने पावले उचलत आज होणारी ही परीक्षा रद्द (स्थगित) करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे लाखो विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा ही परीक्षा कधी होणार, याची वाट पाहावी लागणार असल्याने परीक्षार्थींमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज रविवारी होणाऱ्या या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेच्या आधीच ठाणे परिसरामध्ये पेपर फुटल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना त्यांच्या सूत्रांकडून मिळाली होती. काही टोळ्या पैसे घेऊन विद्यार्थ्यांपर्यंत हा पेपर पोहोचवत असल्याचा सुगावा पोलिसांना लागला होता. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने सापळा रचून ज्या संशयितांकडे हा पेपर होता, त्यांच्यापर्यंत पोहोचून प्रश्नपत्रिका जप्त केल्या. हा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी तात्काळ शिक्षण विभागाला या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती दिली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पेपरफुटी प्रकरणी पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. ताब्यात घेतलेले हे लोक नेमके कोण आहेत? त्यांच्याकडे हा गोपनीय पेपर कसा आणि कुठून आला? यात मोठ्या कोचिंग इन्स्टिट्यूट चालवणाऱ्या लोकांचा किंवा शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचा हात आहे का? या सर्व बाजूंचा तपास पोलीस करत आहेत. सध्या त्यांची नावे गुप्त ठेवण्यात आली असून, सखोल चौकशीनंतर या रॅकेटचा मुख्य सुत्रधार समोर येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### एसआयटी गठित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

संपूर्ण राज्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत २८ जून २०२६ रोजी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र आज होणाऱ्या टीईटी परीक्षेचा पेपर फुटला आहे. टीईटीचा पेपर फुटल्याने आज होणारी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षक पात्रता परीक्षाचे पेपर फुटल्याने पुन्हा एकदा महाराष्ट्र हादरला आहे. अशातच या घटनेनंतर याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. ठाण्याचे सह पोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी गठित करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## परीक्षा रद्द झाल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील २९ हजार ४०० शिक्षकांना फटका

**नांदेड (प्रतिनिधी)–** आज होणाऱ्या टीईटी परीक्षेचा पेपर ठाणे जिल्ह्यात फुटल्याने ही परीक्षा स्थगित करण्यात आली आहे. याचा फटका नांदेड जिल्ह्यातील २९ हजार ४०० शिक्षकांना बसला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार, दि. २८ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एकूण १०२८ केंद्रांवर शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ घेण्याचे प्रस्तावित होते. नीट २०२६ च्या परीक्षेमधील गैरप्रकार लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना केलेल्या होत्या. पण तरीही आता नांदेड जिल्ह्यातील २९ हजार ४०० शिक्षकांना टीईटी परीक्षेत फटका बसला आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यात ५४ केंद्रांवरून ही परीक्षा होणार होती. यासाठी जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि जिल्हा परिषद सज्ज झाले होते.

तथापि, शनिवार दि. २७ जून २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास गोपनिय माहितीच्या आधारे येथे काही इसमांकडे या प्रश्नपत्रिकेबद्दल माहिती असल्याचे समजल्याने भिवंडी पोलिसांनी सदर ठिकाणी धाड टाकली. यानंतर तपासणीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना बोलावून तातडीने पडताळणी केली असता, सदर इसमांकडे शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) जून २०२६ परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न समान असल्याचे आढळून आल्याने भिवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

सदर परिस्थिती लक्षात घेता दि.२८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पुढे ढकलण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पूर्ण पारदर्शकपणेच व्हावी हा परीक्षा परिषदेचा आग्रह असल्याने व याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे वाटत असल्याने ही परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. शिक्षक पात्रता (टीईटी) परिक्षेबाबत अद्यावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## राज्यातील २७ जिल्ह्यांना आज पावसाचा येलो अलर्ट जारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्यानंतर राज्यात पावसासाठी पोषक वातावरण कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत पावसाची संततधार सुरू असून २७ जून रोजीही अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. दरम्यान, आज रविवार, दि.२८ जून रोजीही राज्यातील २७ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुन्हा तणाव; इराणचा मालवाहू जहाजावर ड्रोन हल्ला, अमेरिकेचे प्रत्युत्तर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराण आणि अमेरिका यांच्यात झालेला युद्धबंदीचा करार अवघ्या नऊ दिवसांतच मोडीत निघण्याची चिन्हे आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या एका व्यापारी जहाजावर इराणने ड्रोन हल्ला केल्यानंतर, अमेरिकेने शुक्रवारी इराणच्या लष्करी तळांवर आणि रडार केंद्रांवर जोरदार हवाई हल्ले केले. या कारवाईमुळे पर्शियन आखातातील तणाव पुन्हा एकदा टोकाला पोहोचला आहे.



२५ जून रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून ओमानच्या किनारपट्टीवरून प्रवास करणाऱ्या ‘एम/व्ही एव्हर लव्हली’ या सिंगापूरचे ध्वज असलेल्या व्यापारी जहाजावर इराणने आत्मघातकी ड्रोनद्वारे हल्ला केला. इराणने एकूण चार ड्रोन डागले होते, त्यापैकी तीन ड्रोन अमेरिकेने हवेतच पाडले, तर एका ड्रोनचा फटका जहाजाच्या वरच्या भागाला बसला. सुदैवाने, या हल्ल्यात जहाजावरील कोणत्याही कर्मचाऱ्याला दुखापत झाली नाही आणि जहाजाचे इंजिन व नौकानयन यंत्रणा सुरक्षित राहिली.

या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन सेंट्रल कमांडने २६ जून रोजी इराणवर ९० मिनिटे मोठी लष्करी कारवाई केली. अमेरिकेच्या एफ-३५ आणि एफ-१६ लढाऊ विमानांनी इराणच्या किनारपट्टीवरील तीन आणि ‘केशम’ बेटावरील एका ठिकाणासह एकूण चार लष्करी तळांना लक्ष्य केले. यामध्ये इराणचे क्षेपणास्त्र साठे, ड्रोन केंद्रे आणि किनारपट्टीवरील रडार यंत्रणा उद्ध्वस्त करण्यात आल्या.

अमेरिका आणि इराण यांच्यात १७ जून रोजी एक १४ कलमी युद्धबंदी करार झाला होता. या करारानुसार ६० दिवसांसाठी हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांकडून कोणताही कर न घेण्याचे इराणने मान्य केले होते.

## झारखंडमध्ये वादळ-विजांमुळे १६ जण ठार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील ६ राज्ये उत्तराखंड, उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि हरियाणाच्या अनेक भागांमध्ये मान्सूनपूर्व पाऊस सुरू आहे. मात्र, सहा राज्यांमध्ये तीव्र उष्णताही जाणवत आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान आणि हरियाणात पारा ४२ अंशांपेक्षा जास्त नोंदवला गेला. यामुळे आतापर्यंत १६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

मध्य प्रदेशातील बालाघाट मध्ये शुक्रवारी वीज कोसळून ४ लोकांचा मृत्यू झाला, तर आठ जण भाजले. देवासमध्ये वादळी वाऱ्यासह पावसामुळे घराच्या बाल्कनीचा काही भाग कोसळला, या अपघातात २ महिलांचा मृत्यू झाला.

तर, झारखंडमध्येही वीज कोसळून १० आणि छत्तीसगड मध्ये दोन लोकांचा मृत्यू झाला. उत्तराखंडमधील चमोलीमध्ये रात्री उशिरा झालेल्या मुसळधार पावसानंतर ढगफुटीसारखी घटना घडली. यामुळे शाळा, ८ मोठी वाहने, रुग्णवाहिका आणि घरांमध्ये ढिगारा शिरला आहे.

मान्सूनने देशातील २२ राज्यांना व्यापले आहे. ५ जुलैपर्यंत उर्वरित राज्यांना व्यापू शकतो. यूपीमध्ये मान्सून ८ दिवस उशिरा आहे. तो सहसा २० जूनपर्यंत येतो, पण यावेळी १५ दिवसांपासून बिहार सीमेवर थांबला आहे. तो पुढील २ दिवसांत बिहार सीमेवरून राज्यात प्रवेश करू शकतो. मध्य प्रदेशात प्रवेश केल्यानंतर मान्सून थांबला आहे. गेल्या ३ दिवसांपासून तो पुढे सरकला नाही. तो पुढे सरकण्याची प्रतीक्षा आणखी २-३ दिवस वाढली आहे. शुक्रवारी सिवनीमध्ये ५० मिमी पाऊस झाला. शाजापूरच्या शुजालपूर, अकोदियासह आसपासच्या परिसरात जोरदार पाऊस झाला आहे.

## उद्धव ठाकरेंकडून पहिला उमेदवार जाहीर, फुटीर खासदारांच्या मतदारसंघातून घोषणा

**वाशिम (प्रतिनिधी)–** उद्धव ठाकरे शनिवारी वाशिम दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आपला पहिला उमेदवार जाहीर केला आहे.

राज्यातील ऑपरेशन टायगरमुळे उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाला मोठा धक्का बसला असून ६ खासदारांच्या फुटीनंतर उद्धव ठाकरेंसह शिवसेना उबाठा पक्षाच्या नेत्यांनी फुटीर खासदारांच्या मतदारसंघात दौरा सुरू केला आहे. शनिवारी वाशिम-यवतमाळ लोकसभा मतदारसंघात जाऊन उद्धव ठाकरेंनी खासदार संजय देशमुख यांच्यावर हल्लाबोल केला. यावेळी, वाशिम विधानसभा मतदारसंघातून डॉ. सिद्धार्थ देवळे यांची उमेदवारीच जाहीर केली आहे.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, मी निघालो दौऱ्याला आणि बातम्या सुरु झाल्या, काहींनी कोल्हेकुई सुरू केली, उद्धव ठाकरे फिरत नाही, शिवसेना संपली. म्हणून म्हटलं आता शिवसेना दाखवतो, कडवट शिवसैनिक कुठेही गेला नाही तो तिथेच आहे. तुम्ही आमदार खासदार निवडून दिले, आता गद्दारीला थारा द्यायचा नाही, नमक हरामीला थारा द्यायचा नाही, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी फुटीर खासदारांवर तोफ डागली. मिंदे पासून हे सगळे नमक हराम, हे लुटारू माजले आहेत, राम मंदिर लुटायला लागले आहेत. बाबरी पडली तेंव्हा हे सगळे शेपूट घालून पळाले होते, शौर्य आणि भाजप हे दोन्ही विरुद्ध अर्थी शब्द आहेत. मंदिर वही बनायेंगे म्हणाले, शिवसेना प्रमुख फिरले नसते तर काळ्या कुत्राने भाजपला विचारलं नसतं, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी वाशिम दौऱ्यात भाजपवरही हल्लाबोल केला.

## ‘एफ’ ग्रेड कायम असलेल्या सात महाविद्यालयांतील पीजी प्रवेश स्थगित करण्याचा ‘स्वारातीम’ विद्यापीठाचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण (ट्रिपल ए) प्रक्रियेत महत्त्वपूर्ण निर्णय घेत, यापूर्वी ‘एफ’ ग्रेड प्राप्त झालेल्या २९ महाविद्यालयांपैकी पुनर्तपासणीनंतर २२ महाविद्यालयांना दिलासा दिला आहे. आवश्यक सुधारणा न करणाऱ्या उर्वरित सात महाविद्यालयांमधील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पारंपरिक पदव्युत्तर (पीजी) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशावर स्थगिती लागू करण्यात आली आहे.

यापूर्वी विद्यापीठाने ‘एफ’ ग्रेड प्राप्त २९ महाविद्यालयांना आवश्यक त्रुटी दूर करण्यासाठी मुदत दिली होती. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांनी शैक्षणिक व प्रशासकीय स्तरावर केलेल्या सुधारणा तज्ज्ञ समितीमार्फत तपासण्यात आल्या. समितीच्या अहवालानुसार गुणवत्तेत अपेक्षित सुधारणा झालेल्या १६ महाविद्यालयांची ‘एफ’ ग्रेडमधून वगळण्यात आले आहे, तर तांत्रिक कारणांमुळे ‘एफ’ ग्रेड प्राप्त झालेल्या आणखी सहा महाविद्यालयांनाही दिलासा देण्यात आला. अशा प्रकारे एकूण २२ महाविद्यालयांची नावे ‘एफ’ ग्रेडच्या यादीतून वगळण्यात आली.

पुनर्तपासणीनंतर ‘एफ’ ग्रेडमधून वगळण्यात आलेल्या महाविद्यालयांमध्ये वसंतराव नाईक महाविद्यालय (वसरणी), संत गाडगे महाराज महाविद्यालय (लोहा), पानसरे महाविद्यालय (अर्जापूर), शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (नायगाव), जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय (सिडको, नांदेड), वै. धुंडा महाराज देगलूरकर कॉलेज (देगलूर), श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (माहूर), राजीव गांधी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट (विद्युतनगर, नांदेड), एम.जी.एम. कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड मीडिया सायन्स (नांदेड), विश्वभारती महाविद्यालय (सिडको, नांदेड), श्री गुरुगोविंदसिंघजी पत्रकारिता महाविद्यालय (नांदेड), डी.एस.एम. इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (परभणी), स्वामी विवेकानंद महाविद्यालय (शिरूर ताजबंद), मातृभूमी महाविद्यालय (उदगीर), सरस्वती संगीत कला महाविद्यालय (लातूर) आणि ब्रीलीयंत (रात्रीचे) महाविद्यालय (लातूर) यांचा समावेश आहे.




पुनर्तपासणीत कोणतीही समाधानकारक सुधारणा न झाल्याने छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय (किनवट), यशवंत कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (परभणी), रविंद्रनाथ टागोर चित्रकला महाविद्यालय (परभणी), छत्रपती संभाजी महाराज महाविद्यालय (माहूर), सिंधू कॉलेज ऑफ आय.टी. अँड सायन्स (देगलूर), संत संभाजी शिंदे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स (परभणी) आणि विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (नांदेड) या सात महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पारंपरिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशावर स्थगिती लागू करण्यात आली आहे.

प्रवेशबंदी असतानाही संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्यातून होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय प्रशासन व संस्था पदाधिकाऱ्यांची राहील. अशा विद्यार्थ्यांचे पात्रता व परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, परीक्षा प्रवेशपत्र देण्यात येणार नाही तसेच निकालही जाहीर केला जाणार नाही.

विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरील ‘Affiliation' विभागात हे सुधारित परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून, या निर्णयामुळे शैक्षणिक गुणवत्ता, उत्तरदायित्व आणि विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, महाविद्यालयांनी आवश्यक शैक्षणिक व प्रशासकीय निकषांचे काटेकोर पालन करावे आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी संस्थांनी सातत्याने प्रयत्न करावेत, यामुळे संलग्न महाविद्यालयांमध्ये गुणवत्ता वृद्धीला निश्चितच चालना मिळेल.



## जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या काही वर्षांतील नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळीराजा पुरता कोलमडून गेला आहे. त्यामुळे त्याला आधार देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६’ जाहीर केली. या योजनेची अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे.




विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून या योजनेती आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे. जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या ‘महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने’चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी ‘वन टाईम सेटलमेंट म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे. अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये, यासाठी 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

## अफगाणिस्तानमध्ये ६.२ रिश्टर स्केलचा भूकंप

### जम्मू-काश्मीरसह दिल्ली-एनसीआरमध्येही जाणवले धक्के

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अफगाणिस्तानमध्ये ६.२ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याची माहिती समोर आली आहे. अफगाणिस्तानातील भूकंपाचे धक्के थेट भारतातील जम्मू-काश्मीर, दिल्ली-एनसीआर आणि पाकिस्तानातही जाणवले आहेत. शनिवारी संध्याकाळी अफगाणिस्तानच्या हिंदू कुश भागात ६.२ तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू अफगाणिस्तानमधील कालाफगानपासून सुमारे ८१ किलोमीटर अंतरावर होता.



नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या माहितीनुसार, हा भूकंप जमिनीखाली २१५ किमी खोलीवर झाला. उत्तर पाकिस्तानमधील खैबर पख्तुनख्वा प्रांतात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. दरम्यान, या भूकंपात कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही. मात्र, या भूकंपाचे धक्के अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारत, चीन, ताजिकिस्तान, किर्गिस्तान आणि तुर्कमेनिस्तानमध्ये जाणवले आहेत.

# मी पुन्हा जगायला लागले

लग्नाला पंधरा वर्षे उलटून गेली होती. काळाच्या प्रवाहात स्वराचे आयुष्य दोन किनाऱ्यांमध्ये विभागले गेले होते, घर आणि शाळा. जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखालीही ती कधी तक्रार करत नसे. संसाराच्या वाटेवर ती निष्ठेने चालत होती; पण त्या प्रवासात तिच्या स्वतःच्या इच्छा, आवडी आणि स्वप्ने कुठेतरी मागे पडली होती. जगण्याची सवय झाली होती, पण मनासारखे जगण्याची नाही.

यतिनने स्वराला प्रथम एका लग्नसमारंभात पाहिले होते. ती त्याच्या बहिणीची मैत्रीण होती. रसायनशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेली, बुद्धिमान, आत्मविश्वासू आणि मोहक व्यक्तिमत्त्वाची स्वरा त्याला पहिल्याच भेटीत भावली होती. यतिनच्या वडिलांचा या नात्याला विरोध होता; पण मुलाच्या आग्रहापुढे त्यांना नमते घ्यावे लागले आणि घाईघाईत दोघांचा विवाह झाला.

विवाहानंतर स्वराला एका नव्या घरात नव्हे, तर एका ठरावीक चौकटीत प्रवेश करावा लागला. घरातील परंपरा, नियम, संकेत आणि अपेक्षा तिच्या भोवती हळूहळू जाळ्यासारख्या विणल्या जाऊ लागल्या. सासूची चौकस नजर आणि नणंदांच्या सततच्या सूचना तिच्या प्रत्येक हालचालीवर पहारा देत असत.

घरात शृंगारालाही नियम होते. सजावे, पण मर्यादेत; दिसावे, पण उठून दिसता कामा नये. यतिन उच्चशिक्षित होता, पण त्याच्या विचारांची मुळे परंपरेच्या मातीत खोलवर रुजलेली होती. त्याच्या मते स्त्रीचे मौन हेच तिचे सौंदर्य, तर तिचा संयम हीच तिची ओळख होती. स्वराच्या भावना, आवडी किंवा आत्मअभिव्यक्तीला त्या घरात फारशी जागा नव्हती. तिच्याकडून अपेक्षा होती ती फक्त एक आदर्श पत्नी आणि सून म्हणून भूमिका निभावण्याची.

स्वराला सजायला आवडत असे. रंगीबेरंगी काचेच्या बांगड्या, पायातील पैंजण, हातांवरील मेहंदी आणि कपाळावरील लाल टिकलीहे तिच्यासाठी केवळ अलंकार नव्हते; ते तिच्या अस्तित्वाचे रंग होते. त्या माध्यमातून ती स्वतःला व्यक्त करत असे. परंतु हळूहळू तिच्या या आवडींकडे अपराधासारखे पाहिले जाऊ लागले.

रोज रात्री झोपताना यतिन तिला बांगड्या काढायला सांगत असे. सुरुवातीला स्वराला त्यात काळजीची छटा दिसली. पण एके रात्री त्याने तिरस्काराने म्हटले,

या बांगड्यांच्या आवाजाने मला झोप लागत नाही. असं वाटतं, जणू एखाद्या चेटकीणीच्या शेजारी झोपलो आहे. आणि ती सकाळची पैंजणांची छमछमही बंद कर. आजकाल कोण घालतो हे सगळं? त्या शब्दांनी स्वराच्या मनावर खोल जखम झाली. तिच्या आवडीची, तिच्या सौंदर्यदृष्टीची आणि तिच्या स्त्रीत्वाची तुलना एका भयावह प्रतिमेशी केली गेली होती.

यतिन अशा वातावरणात वाढला होता, जिथे बांगड्या, मेहंदी आणि पैंजण यांना स्त्रियांच्या बंधनांचे प्रतीक मानले जात असे. त्याचे वडील नेहमी म्हणत,

या बांगड्या-पैंजण म्हणजे स्त्रियांच्या बेड्या आहेत. त्या स्वतःला सजवत नाहीत, तर स्वतःलाच कैद करतात. ही विचारसरणी त्याच्या मनात इतकी खोलवर रुजली होती की त्याला शृंगार म्हणजे गुलामगिरी वाटू लागली होती. बाहेरून आधुनिक दिसणारा यतिन आतून मात्र परंपरेच्या वेगळ्याच चौकटीत अडकलेला होता.

एकदा स्वराच्या काचेच्या बांगड्या तुटल्या. सासूने लगेच टोमणा मारला, सौभाग्यवती असून बांगड्या काढून झोपतेस? म्हणूनच अपशकुन होतात. नणंदेनेही व्हिडिओ



कॉलवरून सुनावले,

म्हणूनच यतिनची प्रगती होत नाही. घरातल्या गोष्टींचं काही भान आहे का तुला? शेवटी स्वराने रंगीबेरंगी काचेच्या बांगड्यांचा त्याग करून दोन साध्या सोन्याच्या बांगड्या घालायला सुरुवात केली. तिच्या आवडत्या बांगड्या मात्र कपाटातील एका ड्रॉवरमध्ये बंदिस्त झाल्याजणू तिच्याच स्वप्नांसारख्या.

हळूहळू तिने गप्प राहायला शिकले.

एकदा घरी देवीची पूजा होती. त्या दिवशी तिला लाल साडी नेसण्याची परवानगी मिळाली. तिने हलकासा मेकअप केला, केस नीट मोकळे सोडले आणि अनेक वर्षांनंतर आरशात स्वतःकडे भरभरून पाहिले.

क्षणभर तिला वाटलेहरवलेली स्वरा पुन्हा तिच्यासमोर उभी आहे.

पण तेवढ्यात यतिनचा आवाज कानावर पडला,

मेहंदी लावू नकोस. आणि लावलीच तर रात्री माझ्या शेजारी झोपू नकोस. तिच्या वासाने मला त्रास होतो.

स्वराच्या मनात पुन्हा एकदा वेदनेची लाट उसळली. तिच्यासाठी मेहंदीचा सुगंध आनंदाचा होता; पण तिच्या आनंदालाही कुणीतरी दुर्गंधी ठरवत होते.

खाली गेल्यावर सासू म्हणाली, पूजेच्या वेळी तरी नीट शृंगार करत जा. स्वरा फक्त हसली.

कारण आता तिला समजले होतेतिने किती सजावे किंवा किती साधे राहावे, याचा निर्णय तिच्या हातात कधीच नव्हता.

काही वर्षांनी अर्जुनचा जन्म झाला. घर आनंदाने भरून गेले. पण त्या आनंदाच्या गर्दीतही स्वराचा एकटेपणा शांतपणे तिच्या सोबत चालत राहिला. नंतर तिने शाळेत शिक्षिकेची नोकरी स्वीकारली. विद्यार्थ्यांच्या प्रेमाची आणि सहकाऱ्यांच्या आदराची ती मनकरी ठरली. पण तिच्या अंतर्मनात एक स्त्री अजूनही स्वतःला शोधत होती.

वर्षानुवर्षे तिच्या साड्यांतील रंग फिके होत गेले. कपाळावरील टिकली लहान होत गेली. दागिने कपाटात बंद झाले. तिच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग जणू कुणीतरी एकेक करून पुसून टाकत होते.

आणि मग पुन्हा एकदा आयुष्याने तिच्यासमोर एक दार उघडले. शाळेचा वार्षिक उत्सव जवळ आला. विषय होता 'स्त्रीची स्वतंत्र ओळख'. सर्व शिक्षिकांना लाल साडी नेसण्यास सांगण्यात आले.

स्वराने कपाटाच्या तळाशी ठेवलेली ती जुनी लाल शिफॉनची साडी बाहेर काढली. लग्नानंतर तिने ती पुन्हा कधीच नेसली नव्हती. तिने केस मोकळे सोडले, हलकासा मेकअप केला आणि कपाळावर मोठी लाल टिकली लावली. आरशात स्वतःकडे पाहताना तिच्या डोळ्यांत नकळत चमक आली.

हरवलेली स्वरा परत आली होती.

शाळेत पोहोचल्यावर सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळल्या. विद्यार्थिनी तिच्याकडे कौतुकाने पाहत होत्या. तिच्या व्यक्तिमत्त्वात आज एक वेगळाच आत्मविश्वास झळकत होता. नाटक सुरू झाले. रंगमंचावर उभ्या असलेल्या एका मुलीने ठाम आवाजात संवाद म्हटला माझ्या कपड्यांवरून माझी किंमत ठरवू नका; माझ्या स्वप्नांवरून माझी ओळख जाणून घ्या. जोपर्यंत मी स्वतःला स्वीकारत नाही, तोपर्यंत जग मला स्वीकारणार नाही.

सभागृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले. पण स्वरासाठी त्या टाळ्या नव्हत्या.

तो तिच्या अंतर्मनाचा आवाज होता.

तिच्या मनात वर्षानुवर्षे दडलेले प्रश्न जागे झाले. माझ्या आयुष्याचे निर्णय नेहमी इतरांनीच का घ्यायचे? मला काय आवडावे, कसे दिसावे, कसे जगावे हे ठरवण्याचा अधिकार मला नाही का? त्या दिवशी घरी परतताना तिने आरशात स्वतःकडे पाहिले.

कपाळावरील टिकलीला हलकेच स्पर्श केला. आणि स्वतःलाच एक स्मित दिले. तो क्षण छोटा होता, पण तिच्या आयुष्यातील मोठ्या परिवर्तनाची सुरुवात होती. तिने हळूहळू स्वतःला पुन्हा जगू दिले.

मोठी टिकली.

रंगीबेरंगी बांगड्या.

आवडीच्या साड्या.

हे बदल क्षुल्लक वाटणारे होते; पण तिच्यासाठी ते स्वाभिमानाच्या पुनर्जन्माचे प्रतीक होते. एके दिवशी यतिनने टोमणा मारत विचारले, काय, पुन्हा सजायला सुरुवात केली वाटतं?

स्वरा शांतपणे हसली. तिच्या डोळ्यांत आत्मविश्वासाची चमक होती. ती म्हणाली, हो... आता पुन्हा जगायलाही सुरुवात केली आहे. त्या क्षणी तिच्या हातातील बांगड्या हलक्या आवाजात खणखणल्या. पण तो केवळ काचेचा आवाज नव्हता.

तो तिच्या स्वत्वाचा झंकार होता.

तिला आता उमगले होते

आधुनिक राहायचे की पारंपरिक, साधे राहायचे की सजायचे, हा निर्णय प्रत्येक स्त्रीचा स्वतःचा असतो. तिचा शृंगार, तिचा पेहराव, तिच्या आवडी आणि तिची ओळखयांवर हक्क फक्त तिचाच असतो.

त्या दिवसापासून स्वराने मनाशी एक निश्चय केला आता मी माझ्या अटींवर जगणार. कारण माझा स्वाभिमान, माझे स्वत्व आणि माझी ओळख यांवर कोणाचाही अधिकार नाही.


**– तनुजा चौबे**
**(मूळ हिंदी कथा)**
**(अनुवादः मच्छिंद्र ऐनापुरे)**

# सर्वज्ञ संचित म्हणजे चिंतनाचे चिंतन

नांदेडच्या यशवंत महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप यांच्या सर्वज्ञ संचित या ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच झाले आहे. महानुभाव साहित्याचे अभ्यासक आणि संशोधक म्हणून डॉ. संजय जगताप यांचा परिचय तसा नवा नाही. महानुभाव साहित्यातील स्त्री प्रतिमा अशा सखोल चिंतनातून आपली मांडणी करणाऱ्या डॉ. जगतापांच्या नावावर महानुभाव साहित्याचे चिंतन पर अनेक ग्रंथ आहेत. काही चांगले संपादने आहेत. महानुभावांचे लोक साहित्य हा त्यांचा उत्कृष्ट असा ग्रंथ आहे. त्याचबरोबर त्यांनी सर्वज्ञ संचित हा ग्रंथ लिहिलेला आहे. या ग्रंथांमध्ये महानुभाव पंथाचे तत्वज्ञान, दृष्टीकोन मानवी मूल्य व भाषिक संकल्पना अशा चार विभागात महानुभाव साहित्याचा सखोल परिचय करून देणारे लेख दिलेले आहेत.

जिज्ञासू वाचकाने आणि साधकांनी मुळातून वाचावे असे सांस्कृतिक संचित ते आहे. सुमारे साडेआठशे वर्षांपूर्वी श्री चक्रधर स्वामींनी स्वातंत्र्य हा मोक्षः आणि पारतंत्र्य हा बंध यासारख्या विचारांची व्यापक अशी मांडणी केली. ती काळाच्या कितीतरी पुढे होती. याचा प्रत्यय देणारी लोकोत्तर अशा प्रकारची भूमिका घेत महान अनुभवाच्या संचितावर पुढच्या अनेक पिढ्यांचा विचार तिचे भरण पोषण होईल इतकी गतिशीलतेचे वर्णन, ज्ञान स्वामीनी भक्तांना सांगितले आहे. त्यांनी कर्मकांड, लिंगभेद अंधश्रद्धा, अस्पृश्यता या सर्व गोष्टीला विरोध केला आहे.

स्वातंत्र्याला जवळ केले आहे. समतेला हृदयात ठेवले आहे. आणि बंधुतेला जगण्याच्या सुरात बांधले आहे.




श्री चक्रधर स्वामींच्या विचाराला काळाचे बंधन नाही अनेक शतके लोटली तरीही त्यांनी मांडलेली विचार अजूनही नवे आहेत. ते विचार अडगळीत टाकून समाज व्यवहार साधता येत नाही. काळाच्या कसोटीवर उतरलेल्या कायम आधुनिकतेचे हे सांस्कृतिक लेणे काळाच्या पृष्ठावर उभे आहे.

मध्ययुगीन काळात रूढी परंपरेच्या नावाखाली सामान्याचे होणारे शोषण कसे अव्यवहारी आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. सामान्यांची संख्या प्रत्येक काळात अधिक असते त्यांना अवगत असणारी भाषा उपदेशाची वाणी त्यांच्याचं भाषेत उजागर होणे अत्यंत महत्त्वाचे असते. मुठभरांची मक्तेदारी मोडीत काढून लोकभाषेतून मूल्यांची उभारणी करणारी भाषा सामान्याला समजत असते. श्री चक्रधर स्वामींनी मराठी सारख्या लोक भाषेतून आपले तत्त्वज्ञान सांगितले आहे.

लोकभाषेला धर्म भाषा बनवले आहे.तीचे रुजवलेली हे देखणे मूल्य समाजाच्या दीर्घकाळी कामी येणार आहे .मूल्य असतील तरच विचार टिकतो .अनेक शतके मानवी मूल्य आपल्या अंगा खांद्यावर खेळवत ठेवून जीवाच्या कल्याणाचे गुपित कशात आहे याचा विचार महानुभाव पंथांने मांडला आहे. ज्ञान आणि भक्तीच्या सुरेख संगमावर मूल्याधारीत समाज रचनेचे स्वप्न श्री चक्रधर स्वामींनी पाहिले त्यासाठी त्यांनी जीवाची रान केले आहे. तेराव्या शतकात मांडलेला हा विचार क्रांतिकारक होता .व्यवस्था जर मूल्य पायाच्या टाचेने तुडवत असेल तर माणूस म्हणून तो कसा उभा राहणार .मूल्य हे व्यवस्थेच्या पाठीचा कणा असतात. मूल्य आधारित व्यवस्था जगण्याचा मार्ग सुकर करते. धर्माला शोषणाचे हत्यार करून धर्माचा अन्वयार्थ कसा लावता येणार हा प्रश्न महानुभावांना पडतो. त्यातूनच त्यांचे बंडखोर मन चिंतन करते. खऱ्या धर्माचा, पंथाचा अर्थ सांगण्यासाठी त्यांची परिभाषा समाजाच्या गळी उतरविण्यासाठी कृतिशील कार्यक्रम त्यांनी हाती घेतलेला आहे.

आजच्या आधुनिक व्यवस्थेच्या पाठीमागे पूर्वीच्या महापुरुषांची दृष्टी आणि योगदान असते .आजचा दिसणारा जगण्याचा आधुनिक रस्ता कालच्या पायवाटेतून आलेला असतो. अशा प्रकाश वाटा निर्माण करून श्री चक्रधर स्वामींनी समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. संजय जगताप यांच्या सर्वज्ञ संचित मधील चार विभागात एकूण सोळा लेख आहेत. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचार चिंतनाचा फुलोरा आहे. सर्वज्ञांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन त्यांची मानवतावादी वृत्ती, स्त्रीला त्यांनी कधीही कमी लेखले नाही. तिची प्रतिष्ठा वाढवत ठेवली. याही गोष्टीचा प्रस्तुत पुस्तकात ऊहापोह लेखकाने केला आहे. विटाळा सारख्या शरीर धर्माला, तत्कालीन काळातील समाज व्यवस्थेविरोधी मताला श्री चक्रधरांनी वैज्ञानिक पध्दतीने मांडले आहे. याचेही दाखले जगताप यांनी दिली आहेत One is not born. but rather becomes a woman ही विसाव्या शतकाची मांडणी स्त्रीवादाची असली तरी हिच्या विचाराचा विचार काळ कितीतरी अगोदर श्री चक्रधरंच्या विचारातून सुरू झाला होता. पुरुषाच्या नजरेची ती शिकार होता कामा नये. यासाठी तिने स्वतःला जपले पाहिजे याचीही दक्षता काही दृष्टांतातून सर्वज्ञ श्री चक्रधरांनी नमूद केली आहे. काम, क्रोध, मद, मोह, मत्सर आणि दंभ या सहाचा न्यास म्हणजे संन्यास. असा त्यांचा विचार होता.

स्त्री परमार्थातील धोंड नाही तिने तिच्या मर्यादा सांभाळाव्यात अमर्याद प्रतिभेलाही हाक द्यावी. असाच स्वामींचा विचार होता. म्हणून तर स्वामींच्या परिवारातील स्त्रिया लेखन सामर्थ्यांनी उजळून निघाल्या. संन्यास धारण करण्याचा अधिकार केवळ पुरुषालाच नाही तर स्त्रियांनाही आहे अशी रोखठोक भूमिका सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी मांडली. इतकेच नाही तर त्यांनी अनेक स्त्रियांना संन्यास दिला. काळाचा सुसंगत विचार केला तर हे काम प्रचंड क्रांतिकारक आहे. तुमचा तो जीव आणि या काही जीवलया यातून त्यांची दृष्टी किती पुरोगामी होती हे दिसते.

आहार शास्त्रापासून ते पर्यावरण शास्त्रापर्यंत आणि जगण्याच्या मूल्यतेपासून विश्वबंधुत्व वा पर्यंत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी समाजमनाला दिशा दिलेली आहे. या ग्रंथामध्ये भाषिक संकल्पना, सांकेतिक लिपी महानुभावांची बोली मराठवाड्यातील महानुभाव साहित्य चळवळ याही लेखांचा आधार प्रस्तुत ग्रंथात डॉ. संजय जगताप यांनी विस्ताराने घेतला आहे .सोप्या आणि ओघवत्या शैलीमध्ये डॉ. संजय जगताप यांनी विचारांचे चिंतन मांडले आहे. महानुभाव पंथ आणि त्यांचे तत्त्वज्ञान समजून घ्यायला मदत करणारा हा ग्रंथ अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणून सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे संचित निश्चितपणे या ग्रंथात उपयोगाला आलेले आहे. आकर्षक मुखपृष्ठाची मांडणी डॉ. सतीश बडवे यांचे मलप्रष्ठावरील विचार मोहात पाडणारे हे ठळक वैशिष्ट्ये सर्वज्ञ संचित या ग्रंथात नजरेत भरतात.

श्री चक्रधरांच्या नावातील कल्पकतेची सजावट पुस्तकाला देखणं करते .मुखपृष्ठ पुस्तकाचे प्रवेशद्वार असते आपल्या आशयापर्यंत वाचकाला आमंत्रण देणारा तो संवाद असतो. विजय चित्तरवाड यांच्या कल्पनेतून केलेली सुंदर मांडणी आणि नांदेडच्या सायास पब्लिकेशन चा डोळसपणा या ग्रंथात अनेक ठिकाणी दर्शवतो. प्रकाशक डॉ माधव जाधव यांनी ही ग्रंथ प्रकाशित केला आहे. .त्या निमित्ताने डॉ. संजय जगताप यांच्या कार्यकर्तृत्वाला आमचा दंडवत प्रणाम.

**–प्रा. रामदास बोकारे**
कांताई आमदार नगर, मालेगाव रोड नांदेड
मो. ९१३०६६९६०७

# 'पावसाची सर'

सकाळी सकाळी एक पावसाची सर घरी माझ्या आली
दरवाज्यावर थाप मारत मला उठ म्हणाली,
चल म्हणत हात धरून मला अंगणात घेऊन आली
पहाटेचा गारवा, त्यात पावसाचा ओलावा
मला बघ म्हणाली,
सृष्टीचा नजराणा, त्यात धुक्यात लपलेल्या
क्षितीजाला तूच शोध म्हणाली,
पावसाच्या धारा,
त्यात पडणाऱ्या गारा मला वेच म्हणाली
हिरवळही छान,
त्यात कोकिळेची सुरेल तान मला ऐक म्हणाली
डोंगरातून वाहणारा झरा,
त्यात पाण्याच्या धारा ओंजळीत भर म्हणाली
वातावरणातला वारा,
त्यात सुगंधाने चढलेला मातीच पारा
श्वासात सामाव म्हणाली
हे सर्व आनंदाचे क्षण घेऊन
पावसाची सर घरी माझ्या आली
मला चिंब भिजवून
आठवणींना हृदयात साठव म्हणाली !

**–ज्योती रावराणे,**
कांजूरमार्ग, मुंबई

## प्रस्तराचे अस्तर

त्या अनवट वाटेवरती
ती मजला भेटत होती
संचिताचे प्रस्तर उकळत
मलाच अस्तर देत होती

चालताना माझीच वाट
वळणावर ती भेटत होती
रुंदनगुज आव्हानाचे
मलाच मी हरवत होती

एकाच वेळी सगळ्या
आघाड्या सांभाळत होती
कर्तव्याची श्रृंखला ती
नवनीत ओवीत होती

ती भेटली पाषाणावर
हातोड्याने प्रहार करताना
छिनून उखळं जाती बत्ते
महादेवांच्या पिंडी डोई घेताना


ती भेटली विकताना
सुई-पोत मनेरी पेटी
हाका देता लेकरांच्या मायांना
असते बांधून बाळ ओटी

अंगावर संसाराचा भार पेलत
जगण्यास बळ शोधीत होती
हजारदा मन मारीत मारीत
दुनिया तिची जगवत होती

त्या अनवट वाटेवरती
ती मजला भेटत होती
प्रस्तराचे अस्तर लेत
मी मलाच गवसत होती.

**–अनिता दाने**
नांदेड

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी. व्ही. नरसिंहराव



भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी. व्ही. नरसिंहराव यांची आज जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला.

१९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गाण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता.

१९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते.

नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे.

नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या. या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली.


पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणात संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# चंदेरी

## रमेश सिप्पी यांची विशेष मुलाखत

# हेमाजी अन् मी एकत्र, नशिब अन् ईश्वरी कृपेचा भाग...



**बॉलिवूडची ड्रीम गर्ल हेमा मालिनी आणि ज्येष्ठ चित्रपट निर्माते रमेश सिप्पी यांच्या जोडीने चित्रपटसृष्टीला 'शोले' आणि 'सीता और गीता' सारखे अजरामर चित्रपट दिले आहेत. रमेश सिप्पी यांच्या दिग्दर्शकीय पदार्पणातील 'अंदाज' (१९७१) पासून ते २०२० मध्ये प्रदर्शित झालेल्या त्यांच्या शेवटच्या 'शिमला मिर्ची' या चित्रपटापर्यंत हेमा मालिनी नायिका होत्या. अलीकडेच हेमा मालिनी यांच्या ६० वर्षांच्या कारकिर्दीचा उत्सव साजरा करणाऱ्या 'द ड्रीम गर्ल्स डायमंड ज्युबिली कॉन्सर्ट'च्या घोषणेवेळी रमेश सिप्पी यांनी 'शोले', हेमा मालिनी यांच्यासोबतचा त्यांचा दीर्घकाळचा संबंध, धर्मेंद्र आणि आजच्या बॉलिवूडशी संबंधित इतर अनेक विषयांवर रंजक संवाद साधला...**


हेमा मालिनी यांचे कोणते गुण त्यांना इतर अभिनेत्रींपेक्षा वेगळे ठरवतात? असे रमेश सिप्पी यांना विचारले असता ते सांगतात, की 'हेमाजी खूप चपळ आहेत. त्या पात्र खूप लवकर आत्मसात करतात आणि मग ते सहजतेने पडद्यावर जिवंत करतात. उदाहरणार्थ, बसंतीची भूमिका हेमाजींनी माझ्यापेक्षाही लवकर समजून घेतली आणि त्यांनी ज्या प्रकारे बसंती साकारली, ती एक अजरामर भूमिका बनली. तरीही सुरुवातीला त्यांना ही भूमिका देण्यास मी संकोच करत होतो.' या संकोचाचे कारण विचारले असता, त्यांनी स्पष्ट केले, की 'खरं तर, हेमाजींनी आमच्यासोबत 'सीता और गीता' सारखा एक सुपरहिट चित्रपट आधीच केला होता, ज्यात त्या स्वतः नायिका होत्या, तेही दुहेरी भूमिकेत. बसंतीची भूमिका त्यापेक्षा खूपच लहान होती, त्यामुळे त्या ही भूमिका करतील की नाही याची मला काळजी वाटत होती.'

## मुमताज ठरली असती 'सीता और गीता'

रमेश सिप्पींनी त्यांच्या पहिल्या चित्रपटापासून ते शेवटच्या चित्रपटापर्यंत हेमा मालिनींनाच आपली नायिका म्हणून का पाहिले? त्यांना त्यांच्या सर्व सीता, गीता आणि बसंतीच्या भूमिकांसाठी हेमा योग्य का वाटल्या? याबद्दल सिप्पी म्हणतात, की 'पहिली गोष्ट म्हणजे, तिचे काम नेहमीच उत्कृष्ट राहिले आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे, त्यांच्या नशिबानेही त्यांना साथ दिली. आम्ही 'सीता और गीता'साठी मुमताजजींशी बोललो होतो, पण त्यांच्या तारखा उपलब्ध नव्हत्या. आम्हाला हेमाजींच्या तारखा मिळाल्या. त्या चित्रपटासाठी आम्हाला अधिक तारखांची गरज होती, कारण चांगले काम करण्यासाठी आम्हाला वेळ लागतो. मी घाईगडबडीत चांगले काम करू शकत नाही.' त्याचप्रमाणे, 'अंदाज'मध्ये एका विधवेची भूमिका होती, ज्यासाठी नूतन किंवा एखादी अनुभवी अभिनेत्री अधिक योग्य ठरली असती. हेमाजी खूपच तरुण होत्या, पण ही गोष्ट चित्रपटाच्या पथ्यावर पडली, कारण लोकांना अधिक सहानुभूती वाटली आणि त्यांना वाटले, 'अरेरे, बिचारी, ती किती तरुण आहे आणि इतक्या लहान वयात तिच्यासोबत हे घडले.' एकीकडे, त्यांनी उत्तम काम केले. दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही एकत्र केलेले चित्रपट इतके अप्रतिम ठरले, हे नशिबाचा आणि ईश्वरी कृपेचा भाग आहे.', असे सिप्पी म्हणाले.

## धरमजींची आठवण नेहमीच येत राहील...

आपले वीरू, धर्मेंद्र पाजी यांची आठवण काढताना सिप्पी म्हणाले, की 'धरमजी खूप प्रेमळ माणूस होते. त्यांच्यात एक विलक्षण बालिशपणा होता, जो शेवटपर्यंत त्यांच्यासोबत राहिला. जेव्हा कधी आम्ही भेटायचो, तेव्हा ते मोठ्या प्रेमाने आमचं स्वागत करायचे आणि आम्हाला घट्ट मिठी मारायचे. ते इंडस्ट्रीतील सर्वात प्रामाणिक व्यक्ती होते. आम्हा सर्वांना त्यांची कायम आठवण येत राहील.'



## चित्रपट आजही उत्कटतेने बनवले जातात...

रमेश सिप्पी यांचा प्रतिष्ठित चित्रपट 'शोले' बनवायला जवळपास एक वर्ष लागलं. १ कोटी रुपयांचं बजेट ३ कोटी रुपयांपर्यंत वाढलं. आजचा सिनेमा उत्कटतेपेक्षा प्रकल्पांवर जास्त आधारित आहे का? याबद्दल विचारले असता ते म्हणाले, 'आजही काही चित्रपट मनापासून बनवले जातात. 'धुरंधर'कडे बघा. त्याला किती वेळ लागला, किती पैसा खर्च झाला, किती मेहनत घेतली गेली. इतका महान चित्रपट उत्कटतेशिवाय बनू शकत नाही. दोन भागांमध्ये बनवलेला सात तासांचा चित्रपट, जो खूप लोकप्रियही झाला होता, असं नाही की आज असं होत नाही. ते आजही घडतं.'

## हेमा मालिनींना संगीतमय मानवंदना

फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने असोसिएशन (FWICE) पुढील महिन्यात हेमा मालिनींच्या अभिनय कारकिर्दीच्या ६० व्या वर्षानिमित्त 'द ड्रीम गर्ल्स डायमंड ज्युबिली कॉन्सर्ट'चे आयोजन करणार आहे. एफडब्ल्यूआयसीईचे अध्यक्ष बी. एन. तिवारी यांनी सांगितले की, कविता कृष्णमूर्ती, अनुप जलोटा, शब्बीर कुमार, विजयता पंडित, सुरेश वाडकर, सुदेश भोसले आणि अन्नू मलिक यांसारखे संगीत क्षेत्रातील दिग्गज हेमा मालिनींना संगीतमय मानवंदना देतील.

## अभिनेत्री कंगणा राणावतची विशेष मुलाखत

# यशस्वी महिलांबद्दल नेहमीच वाईट बोललं जातं! ; बॉलिवूड बॅन कल्चर थांबायला हवं...

**ती एक प्रतिभावान महिला आहे, कोणत्याही रुपात ती लगेचच रुपांतरीत होते... स्पष्टवक्ती, धाडसी आहे आणि आपली भूमिका कशी मांडावी हे देखील तिला माहीत आहे. आम्ही बोलत आहोत कंगणा राणावतबद्दल. इंडस्ट्रीत जवळपास दोन दशके घालवलेल्या कंगणाने तिच्या करिअर आणि वैयक्तिक आयुष्यात अनेक चढ- उतार अनुभवले आहेत, परंतु एक अभिनेत्री आणि राजकारणी म्हणून तिला लोकांमध्ये नेहमीच प्रेम मिळाले आहे. आजकाल ती तिच्या 'भारत भाग्य विधाता' या नवीन चित्रपटामुळे चर्चेत आहे. इथे, नेहमीप्रमाणेच, ती विविध विषयांवर मनमोकळेपणाने बोलते...**

## असा जोडीदार हवा, जो मला यश म्हणून पाहील...

कंगणाच्या सोशल मीडियावरील मंगळसूत्रातील लूकमुळे तिच्या लग्नाबद्दल बरीच अटकळ बांधली गेली होती, मात्र नंतर हे तिच्या चित्रपटाचा एक भाग असल्याचे स्पष्ट झाले. जेव्हा तिला लग्न आणि तिच्या जीवनसाथीबद्दल विचारले, तेव्हा ती हसली आणि म्हणाली, की 'मला माहित होतं की हा प्रश्न विचारला जाईल. माझा विवाह संस्थेवर गाढ विश्वास आहे, पण माझा विश्वास आहे की प्रत्येक व्यक्तीची स्वतःची वेळ असते. बाकी सर्व देवाच्या इच्छेवर अवलंबून आहे, कारण प्रत्येकाचे आयुष्य सारखे नसते. मी मनाने एक रोमँटिक व्यक्ती आहे आणि लग्न व जोडीदार या दोन्हींवर माझा विश्वास आहे. जे काही माझ्या नशिबात आहे, ते मला नक्कीच मिळेल.' कंगणाने म्हटले आहे. आता मला वाटते की माझ्या आयुष्यात जो कोणी येईल, त्याला माझा अभिमान वाटला पाहिजे. एका विशिष्ट वयाला पोहोचल्यावर आपण अनेक गोष्टी मागे सोडून देतो आणि आपल्या स्वतःच्या शांततेला आणि आरामाला महत्त्व देऊ लागतो. आज मला असा जीवनसाथी हवा आहे जो माझी कम्फर्ट झोन समजून घेईल आणि मला एक यश म्हणून पाहील, असे कंगणा म्हणाली.



## बॉलिवूड बॅन कल्चर हे बुलिंगचेच रुप

रणवीर सिंगला मिळालेल्या असहकाराच्या नोटीसच्या मुद्द्यावर नुकतेच त्याला पाठिंबा देणाऱ्या कंगणा राणावतने बॉलिवूडच्या 'बंदी संस्कृती'वरही आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे. ती म्हणाली, की 'चित्रपटसृष्टीत गटबाजी आधीपासूनच अस्तित्वात होती, पण आता ती अधिकाधिक उघड होत आहे. अनेक कलाकारांनी याबद्दल आवाज उठवला आहे. ऐश्वर्या रायनेही सांगितले होते की, एके वेळी तिची पाच वर्षांची डायरी अचानक कोरी झाली होती. अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे कलाकारांनी त्यांना सामोरे जाव्या लागलेल्या गटबाजी आणि बहिष्काराचा उल्लेख केला आहे. कंगणा म्हणाली, की 'गटबाजी सर्वत्र अस्तित्वात आहे, पण जेव्हा त्याचा परिणाम कोणाच्या तरी करिअरवर होऊ लागतो, तेव्हा ते छळाचे रूप धारण करते. जसे शाळांमध्ये छळाविरुद्ध नियम आहेत, त्याचप्रमाणे इंडस्ट्रीमध्येही अशा प्रवृत्ती थांबवल्या पाहिजेत.'


## महिलांकडे संशयाने अन् पूर्वग्रहाने पाहतात...

कंगणाचा विश्वास आहे की आजही समाजात कणखर आणि यशस्वी महिलांकडे संशयाने आणि पूर्वग्रहाने पाहिले जाते. कंगणा सांगते, की ही चिंतेची बाब आहे. मी या विषयावर अनेकदा लिहिले आणि बोलले आहे. एखादी स्त्री राजकारणी असो, कायदेतज्ञ असो किंवा उच्च पदस्थ व्यावसायिक असो, तिचे यश अनेकदा तिची मेहनत आणि प्रतिभेऐवजी तिच्या चारित्र्याशी जोडले जाते. कंगणाच्या मते, जगाच्या कोणत्याही भागातील स्त्रिया या मानसिकतेतून पूर्णपणे मुक्त झालेल्या नाहीत. आपण अनेकदा पाहतो की, एखादी यशस्वी स्त्री इतक्या उच्च पदावर पोहोचण्यासाठी तिने कोणासोबत तरी संबंध ठेवले होते, असे म्हटले जाते. तिच्या कर्तृत्वाला मान्यता देण्याऐवजी तिला कमी लेखण्याचा प्रयत्न केला जातो, असे कंगणा स्पष्टपणे म्हणाली.

## चौकटीत पाहिले जाते...

कंगणा म्हणते, की सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे स्त्रियांकडे सतत त्यांच्या लैंगिकतेच्या चौकटीत पाहिले जाते. त्यांच्या वयाचा विचारही केला जात नाही. अगदी ६० किंवा ७० वर्षांच्या महिलेलाही अपमानजनक आणि लैंगिक सूचक मीम्सचा सामना करावा लागतो. हे केवळ आपल्या देशातच नाही, तर ज्या देशांना आपण अधिक खुले आणि प्रगतीशील समाज मानतो, तिथेही घडते. कंगणा स्त्रियांच्या कपड्यांविषयी आणि व्यक्तिमत्त्वाविषयीच्या रूढ कल्पनांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करते. ती म्हणते, की जर एखाद्या स्त्रीला सुंदर दिसायचे असेल आणि ती छान कपडे घालत असेल, तर तिच्याबद्दल वाट्टेल ते बोलले जाते. लोक असे गृहीत धरतात की ती हे केवळ पुरुषांचे लक्ष वेधून घेण्यासाठी करत आहे. मी हा विचार जवळपास प्रत्येक समाजात पाहिला आहे. एखाद्या व्यक्तीच्या पेहरावाला किंवा आत्मविश्वासाने स्वतःला सादर करण्याला तिच्या चारित्र्याशी जोडणे अत्यंत चुकीचे आहे. दुर्दैवाने, आजही असे घडते आणि यात बदल होणे आवश्यक आहे, असे कंगणा म्हणाली.

## माझ्यासोबत अनेक घटना घडल्या...



कंगणा राणावत म्हणते, की तिला स्वतःला बॉलिवूडच्या 'बंदी संस्कृती'चा आणि छळाचा अनेक वेळा सामना करावा लागला आहे. ती म्हणाली, की 'मी याबद्दल अनेकदा उघडपणे बोलले आहे. एक काळ असा होता जेव्हा मीडियाने माझ्यावर बंदी घातली होती आणि एक काळ असा होता जेव्हा संपूर्ण इंडस्ट्रीने मला बाजूला सारले होते. माझ्यावर असंख्य खटले दाखल झाले आणि मला कायदेशीररित्या गोवण्याचे प्रयत्न झाले. मला असे अनेक अनुभव आले आहेत. त्यामुळे, माझा विश्वास आहे की या छळवणुकीच्या व्यवस्थेला विरोध झालाच पाहिजे.' कंगणाने स्पष्ट केले की त्या कठीण काळात तिचा विश्वास हीच तिची सर्वात मोठी ताकद बनली. ती म्हणाली, की 'जेव्हा मी घर सोडले, तेव्हा माझ्याकडे काहीही नव्हते. देवानेच मला आधार दिला आणि पुढे नेले. आपण हे कधीही विसरता कामा नये की, आपले आयुष्य कितीही मोठे किंवा लहान असले तरी, देवच आपल्याला सर्व काही देतो. कोणताही माणूस आपले पालनपोषण करत नाही आणि आपणही कोणाला काही देत नाही. जेव्हा तुम्ही हे सत्य स्वीकारता, तेव्हा तुमच्या आत एक वेगळीच शक्ती निर्माण होते. माझे कुटुंब कोणत्याही व्यक्तीवर किंवा इंडस्ट्रीवर अवलंबून राहील, असा विचार मी कधीच केला नव्हता. याच विश्वासाने मला त्या कठीण काळातून बाहेर पडण्याची शक्ती दिली.

## अभिनेता आशुतोष राणाची विशेष मुलाखत

# नाटकासारखी जादू सिनेमा अन् ओटीटी प्लॅटफॉर्मवर नाहीच, दिल्ली मूल्यांचे माहेरघर...

**अभिनेते आशुतोष राणा यांची टीव्ही आणि चित्रपटांमध्ये एक मोठी कारकीर्द आहे. त्यांनी नाट्यप्रयोगांद्वारेही प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. त्यांना वाटते, की सिनेमामध्ये नाटकासारखी जादू नाही. विशेष मुलाखतीत ते म्हणाले, की माझ्या वैयक्तिकरित्या वाटतं, की नाटकात एक मोठी जादू आहे, जी सिनेमा, टेलिव्हिजन किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर नाही... कारण कोणतेही नाते आनंददायी होण्यासाठी तुमच्यातील समन्वय आणि संवाद दोन्ही आवश्यक आहेत. कधीकधी आपण एखाद्याशी जोडले जातो पण संवाद साधू शकत नाही. कधीकधी आपण संवाद साधतो पण जोडले जाऊ शकत नाही. त्यामुळे आपला आनंद अपूर्ण राहतो, असे सांगून ते म्हणाले, की कोणत्याही कलाकारासाठी सर्वात मोठी भेट म्हणजे प्रेक्षकांनी त्यांच्या सादरीकरणाला दिलेली मनापासूनची दाद. ही अत्यंत आनंदाची बाब आहे की दिल्लीने आम्हाला कधीही निराश केले नाही. आतापर्यंत आम्ही दिल्लीत आमच्या 'राम' नाटकाचे १५० हून अधिक प्रयोग सादर केले आहेत...**



## आमची मूल्ये दिल्लीत खोलवर रुजलेली...

एनएसडीचे पदवीधर असलेल्या आशुतोष यांचा दिल्लीशी दीर्घकाळचा संबंध आहे. ते म्हणतात, की दिल्ली नेहमीच एक अद्भूत शहर राहिले आहे. त्यात सर्व वर्ग, जाती आणि संस्कृती सामावलेल्या आहेत. ज्याला तुम्ही संस्कृती म्हणता, ते सर्व तुम्हाला दिल्लीत मिळेल. इथे शिक्षण आहे, इथे दीक्षाविधी आहेत. आपण दिल्लीला नेहमीच देशाची राजधानी मानले आहे आणि जर आपण इतिहासाकडे पाहिले, तर आपल्याला या शहराच्या निर्मिती आणि विघटनाची एक मोठी परंपरा दिसते

## आशुतोष राणा यांच्याकडे लेखनाची कलाही...

आशुतोष यांनी सिनेमा, टीव्ही, ओटीटी प्लॅटफॉर्म आणि नाट्यक्षेत्र यांसारख्या विविध माध्यमांत काम केले आहे. या माध्यमांमध्ये त्यांना काय फरक जाणवतो? या संदर्भात ते म्हणाले, 'यात आणखी एका गोष्टीची भर घाला: लेखन. माझा विश्वास आहे की ही सर्व अभिव्यक्तीची माध्यमे आहेत. मग ते सिनेमा असो, टेलिव्हिजन असो, ओटीटी प्लॅटफॉर्म असो, नाट्यक्षेत्र असो किंवा पुस्तक लेखन असो. ईश्वरी कृपेने, आम्हाला या सर्व माध्यमांमध्ये स्वतःला व्यक्त करण्याची समान संधी मिळाली आहे आणि लोकांनी त्या संधींचे खूप कौतुक केले आहे. मी त्यांना केवळ माध्यम म्हणूनच पाहतो. हे माध्यम मोठे आहे की ते माध्यम लहान आहे, हे मी पाहत नाही. माझा विश्वास आहे की प्रत्येक माध्यमाला त्याच्या मर्यादा असतात आणि प्रत्येक माध्यम, विचार केला तर, महान आहे.'

## मला अभिनयासाठी कोणी बोलावले नाही...

आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीबद्दल आशुतोष म्हणतात, की अभिनय ही आमची आवड, आमचा व्यवसाय आणि आमचे शिक्षण आहे. याचा अर्थ असा की अभिनय ही एक गरज, एक सवय, एक संस्कृती आणि एक परंपरा आहे. आम्हाला यायला सांगणारे पत्र कोणीही पाठवले नाही. जर आम्ही आलो नाही किंवा आम्ही कृती केली नाही, तर ही कला संपुष्टात येईल. आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी तुम्ही आवश्यक आणि मूलभूत प्रयत्न केले पाहिजेत. म्हणून, मी माझे काम करतो आणि जर मला एखादी भूमिका साकारण्याची इच्छा असेल, तर मी त्यासाठी झटतो. जर ती भूमिका मला मिळाली, तर मी ती खूप चांगल्या प्रकारे साकारतो. जर ती मिळाली नाही, तर आम्ही असे गृहीत धरतो की तुम्हाला तुमच्या भविष्यातील इच्छा पूर्ण करण्यासाठी तुमचे प्रयत्न चौपट करावे लागतील. माझा विश्वास आहे की तुम्ही तुमच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वतःच प्रयत्न केले पाहिजेत.

# मुंबईत मोहरम मिरवणुकीत १४,९०० विषारी कॅप्सूल जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबईच्या भायखळा परिसरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मोहरमच्या मिरवणुकीदरम्यान उंदीर मारण्यासाठी विषारी गोळ्या वाटल्याप्रकरणी भायखळा पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली आहे. अधिकाऱ्यांनी संशयिताकडून एकूण १४,९०० (१४,९००) विषारी गोळ्या जप्त केल्या आहेत. या घटनेमागे एक मोठे षडयंत्र असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मोहरमच्या दिवशी चार जणांना कॅप्सूल वाटत असताना भायखळा पोलिसांनी एका



व्यक्तीला अटक केली. पोलीस उपआयुक्त जयंत मीना यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, मिरवणुकीदरम्यान आरोपी परवानगीशिवाय कॅप्सूल वाटत असल्याचे पाहून पोलिसांना संशय आला. तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून १४,९०० विषारी कॅप्सूल जप्त केल्या. या कॅप्सूलमध्ये झिंक फॉस्फाईड असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

या कॅप्सूलचे सेवन केलेल्या एका व्यक्तीची प्रकृती खालावली असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या कारवाई दरम्यान पोलिसांनी संशयिताकडून १४,९०० कॅप्सूल जप्त केल्या. तपासात असेही उघड झाले की, त्याने ३०,००० रिकाम्या कॅप्सूल आणि ५० किलो फॉस्फरसची मागणी केली होती. आरोपी हा बीबीए पदवीधर असून त्याचा पेंन्ट व्यवसाय आहे. आरोपीने या आधी इराक देशाचा दौरा केल्याचा पोलीस तपासातून समोर आले आहे. दरम्यान,आरोपीचा कोणत्याही दहशतवादी संघटनेशी संबंध आहे का, तसेच मोठा घातपात घडवून आणण्याचा त्याचा उद्देश होता का, याचा सर्व बाजूंनी तपास भायखळा पोलीस करत आहेत. तपास पूर्ण होईपर्यंत या प्रकरणामागील नेमका हेतू स्पष्ट झालेला नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## Change In Name

My Old Name is **MOHAMMAD DANIYAL ABDUL MAJID** which now I am changing as New Name **MOHAMMED DANIYAL ABDUL MAJID** Hence forth my all correspondance will be done as per my new name Please consider the same.

Sign By: **MOHAMMED DANIYAL ABDUL MAJID**
H.No.9-2-324 Bilal Nagar Tyre Board
Near Hazrat Bilal Masjid Itwara Nanded
Maharashtra - 431604 Mob: 7775883122

## Change In Name

My old Name is **MD. RAUFODDIN M.A. HAFIZ** Which now I am changing new Name MOHAMMED RAUFODDIN ABDUL HAFEEZ Henceforth my all correspondence will be done as per my new Name. Please consider the Name

Address - H.No.1.2.24/3 Natkar Galli
Degloor Dist Nanded. Pin No.431717
Mobile No. 9890446030

## Change In Name

My old name is **MOHAMMED QUDDUS THEKIYA** which is now I am changing New name **HAJI KHUDDUS THEKIYA** hence forth my all correspondence will be done as per my New name, please consider the name.

Address - HAJI KHUDDUS
THEKIYA 7-2-1 H M PALACE,ITWARA
NANDEDMaharashtra 431604 Mob
7774067771

## Change In Name

My Old Name is **LAXMI KHUSHAL TUPDALE** which now I am changing as New Name **LAXMI KHUSHAL TUPDALE.** Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

CONTACT - LAXMI KHUSHAL TUPDALE
W/O KHUSHAL TUPDALE
At Post Naigaon, Tq. Naigaon, Dist. Nanded,
PIN CODE 431709 CONTACT NO.: 9011729244

## Change In Name

My old name is **MOHAMMED QUDDUS THEKIYA** which is now I am changing New name **HAJI KHUDDUS THEKIYA** hence forth my all correspondence will be done as per my New name, please consider the name.

Address - HAJI KHUDDUS
THEKIYA 7-2-1 H M PALACE,ITWARA
NANDEDMaharashtra 431604 Mob
7774067771

## Change In Name

My old Name is **MD. RAUFODDIN M.A. HAFIZ** Which now I am changing new Name MOHAMMED RAUFODDIN ABDUL HAFEEZ Henceforth my all correspondence will be done as per my new Name. Please consider the Name

Address - H.No.1.2.24/3 Natkar Galli
Degloor Dist Nanded. Pin No.431717
Mobile No. 9890446030




### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३८१

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. १२५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, धारेखान शफिखान पठाण रा. करंजी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२५ वार्ड क्र. १९ शेख अमीना शेख मिरासाब यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. १७/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – शे. इब्राहीम, पश्चिमेस – शेख साजीद, दक्षिणेस – शेख तरबेज, उत्तरेस – रोड.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर प्रगटन

मौजे गोरठा ता. उमरी जि. नांदेड येथील गोरठा हद्दीतील शेत गट नं. १०५/२ मधील ७८ आर पैकी ४० आर (१ एक्कर) एवढे क्षेत्रफळ असून श्री अंकुश शंकर राठोड मु. सेवानगर तांडा ता. उमरी जि. नांदेड यांच्याकडून मी माधव भगवान जाधव रा. सेवानगर तांडा गोरठा ता. उमरी जि. नांदेड विकत घेण्याचा सौदा केला आहे. सौद्यापोटी बयाना रक्कम म्हणून ५० हजार रूपये दिले आहेत. या शेतावर / जमिनीवर कोणाचा आक्षेप/हक्क/उजर / बोजा / गहाण खत आणि दान कोणाला दिली असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपली तक्रार खालील पत्यावर नोंदवावी. मुदतीनंतर आलेला कोणताही आक्षेप, तक्रार मान्य केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**१) माधव भगवान जाधव**
**मु. सेवानगर तांडा गोरठा ता. उमरी जि. नांदेड**
**मो.नं. ७७७६८०१०२६**
**२) अंकुश शंकर राठोड**
**मु. सेवानगर तांडा गोरठा ता. उमरी जि. नांदेड**
**मो.नं. ९०४९६९५२६५**

## Change In Name

My old name is: **NASEEM BEGUM** which now I am changing as new Name: **NASEEM FIRDOSE.** hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

Sign By: NASEEM FIRDOSE
H.No.9-6-1075/1, Rahmat Nagar, Near Moti Masjid, Gadegao Road Behind Tajvidul Quran, Nanded- PIN: 431604.
Maharashtra Ph: 9975501766

## Change In Name

My old name is: **ABDUL WASE SANI** which now I am changing as new Name: **ABDUL WASAY SANI**. hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

Sign By: ABDUL WASAY SANI
H.No.9-6-1075/1, Rahmat Nagar, Gadegao Road, Near Moti Masjid, Nanded-PIN: 431604.
Maharashtra Ph: 9975501766

## Change In Name

My old Name is **ZAKIYA BEGUM** Which now I am Changing as. New Name **ZAKIYA BEGUM SAYYAD SALAM** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

Address: H.NO.1-23-155, ASLAM KIRANA, ASRA NAGAR,, SANGVI BK, Nanded, 431605 Mob: 9921597490

## Change In Name

My old Name is **NASAR ALI** Which now I am Changing as New Name **MOHAMMED NASER ALI MOHAMMED ASGAR ALI.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

Address: HOUSE NO.9-4-1090,
DEGLOOR NAKA ROAD, NEAR MAJID
KIRANA, RAM RAHIM NAGAR, ITWAR,
NANDED. 431604 Mob: 9225751232

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३८०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १२ मालमत्ता क्र. १७९/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख मतीन शेख मन्नान रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १७९/२ वार्ड क्र. १२ म. लतीफ म. नवाज यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. १५/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – ......., पश्चिमेस – ............., दक्षिणेस – .........., उत्तरेस – .............

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १२ मालमत्ता क्र. १७९/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख अतिक शेख मन्नान रा. हिमायतरगन ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १७९/१ वार्ड क्र. १२ म. गौस म. नवाज यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. १६/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – ......., पश्चिमेस – ............., दक्षिणेस – .........., उत्तरेस – .............

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**शासनमान्य**
**महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान नांदेड द्वारा संचलित**

# नवजीवन मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह

**शोभा नगर, नांदेड**

## मोफत प्रवेश देणे चालू आहे

सन २०२६-२७ साठी या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या मागासवर्गीय २४ गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृहात शासकीय नियमाप्रमाणे मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | भटक्या विमुक्त जमाती | १७ टक्के |
| ४ | आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |

नोट – वरील वर्गवारीप्रमाणे वसतिगृहात प्रवेश देणे सूरू आहे. तरी गरजू विद्यार्थी, पालक यांनी त्वरीत खालील ठिकाणी संपर्क करून प्रवेश निश्चित करावा.

**अधिक्षक**
**नवजीवन मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह**
**शोभानगर नांदेड**

**अध्यक्ष/सचिव**
**महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान देगलूर**
**ता. देगलूर जि. नांदेड**
**मो.नं. ८८०६११६६७८**

### जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, माया संदिप लव्हारे रा. गणेशवाडी ता. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १३७/१ वार्ड क्र. १५ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : मारोती मंदिर, **पश्चिमेस** : नवसागरे, **दक्षिणेस** : रस्ता, **उत्तरेस** : जाफर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, परमेश्वर कोंडबा खंदारे रा. आंबेडकर चौक ता. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १९१/१ वार्ड क्र. ०८ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : साहेबराव हनवते यांचे घर, **पश्चिमेस** : नागसेन खंदारे यांचे घर, **दक्षिणेस** : कालॅनी रस्ता, **उत्तरेस** : उत्तम भवरे यांचे घर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, चंद्रकला भिमराव हनवते रा. आंबेडकर चौक ता. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १६८/१ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : पाटील आंबेगावकर, **पश्चिमेस** : आनंद संभाजी हनवते, **दक्षिणेस** : कांबळे, **उत्तरेस** : अब्दुल बाकी अब्दुल करीम.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री गंगाधर पिराजी वाघमारे रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. २९१ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : रस्ता, **पश्चिमेस** : तुकाराम हळदे, **दक्षिणेस** : रहिम कुरेशी, **उत्तरेस** : रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७८

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५४० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मो. अकबर नुर मोहम्मद रा. खुबा चौक ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५४० वार्ड क्र. २१ नजीब खान युसुफ खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३७५/२०२६ दि. ०९/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. ८३, पश्चिमेस – प्लॉट क्र. ८५, दक्षिणेस – प्लॉट क्र. ५३, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४२० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद रिझवान अहेमद रफिम रा. रहिम कॉलनी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४२० वार्ड क्र. १४ मो. शरफोद्दीन मो. शेख हुसेन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८३६/२०२६ दि. १९/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – वानखेडे यांची जमीन, पश्चिमेस – २० फुटाचा रस्ता, दक्षिणेस – वानखेडे यांची जामीन, उत्तरेस – २० फुटाचा रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४३० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मिर्झा मुजाहिद बेग मिर्झा जाफर बेग रा. रहिम कॉलनी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४३० वार्ड क्र. १४ मो. शरफोद्दीन मो. शेख हुसेन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८३५/२०२६ दि. १९/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – २० फुटचा रोड, पश्चिमेस – प्लॉट नं. २५, दक्षिणेस – वानखेडे यांची जामीन, उत्तरेस – प्लॉट नं. १५.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ३१८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, बिलाल अहेमद अब्दुल खुरेशी रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३१८ वार्ड क्र. १५ अब्दुल हमीद अब्दुल कादर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. १९/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – मो. बिलाल, पश्चिमेस – कॉलनी रस्ता, दक्षिणेस – मालमत्ता क्र. ३१७, उत्तरेस – मजहर यांची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ४९ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, तुषार संतोष बनसोडे रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४९ वार्ड क्र. १५ दत्ता माधव चव्हाण यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. १८/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – मालमत्ता क्र. ६४, पश्चिमेस – कॉलनी रस्ता, दक्षिणेस – मालमत्ता क्र. ५०, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३७३

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०८ मालमत्ता क्र. २१२/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, विशाल भाऊराव लोखंडे रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २१२/२ व ०८ साहेबराव लक्ष्मणराव हनवते यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. ०८/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – गयाबाई भुजंगराव, पश्चिमेस – रमाबाई हनवते, दक्षिणेस – कॉलीनी रस्ता, उत्तरेस – बालाजी गायकवाड.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्याात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# हत्तीवरील जीवंत देखाव्यासह राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी

## ◆ मर्दानी खेळ, शिवकालीन युद्धाच्या देखाव्याने जिंकली नांदेडकरांची मने



**नांदेड (प्रतिनीधी)** –आरक्षणाचे जनक लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त फुले, शाहू, आंबेडकर मेमोरिअल ट्रस्ट नांदेड व मराठी नाऊ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २६ जून रोजी नांदेड शहरामध्ये जयंती महोत्सव व शोभायात्रा काढण्यात आली. विशेष म्हणजे हत्तीवरून महाराजांचा जीवंत देखावा सादर करण्यात आला आणि साखर वाटप करून राजर्षी शाहू महाराज यांची अनोख्या पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीत ऊंट, घोडे, ढोल, मर्दानी खेळ, मल्लखांब, लेझीम पथक याकडे नांदेडकरांचे लक्ष वेधले होते.

२६ जून रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी केली जाते, परंतु शाहू महाराजांची जयंती दिवाळीसारखी साजरी करा, या बाबासाहेबांनी दिलेल्या संदेशाला प्रमाण मानत नांदेडमध्ये अतिशय आगळ्या-वेगळ्या पद्धतीने या जयंती महोत्सवानिमित्त रॅली काढण्यात आली.

याप्रसंगी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून आ. आनंदराव बोंढारकर, महापौर सौ. कविता मुळे, सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर, नगरसेविका सौ. संध्या महेंद्र देमगुंडे या मान्यवरांच्या हस्ते शोभायात्रेला झेंडा दाखवून रॅलीस प्रारंभ करण्यात आला.

फुले, शाहू, आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष इंजि. प्रवीण खंदारे, सचिव प्रा. डॉ. शुद्धोधन एडके या मुख्य संयोजकांसह जयंती मंडळाचे अध्यक्ष अशोका क्लिनिकचे संचालक डॉ. विकास वाठोरे, पंचशील विद्यालयाचे बाळासाहेब लोणे, वृत्तपत्र वितरण संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष बालाजी पवार, ॲक्सेसचे इन्फ्रा मॅनेजर इंजि. प्रशांत दवणे, मौर्य प्रतिष्ठानचे महेंद्र देमगुंडे आदींनी या जयंतीसाठी पुढाकार घेतला.

या मिरवणुकीत हत्तीचा जीवंत देखावा त्यावर राजर्षी शाहू महाराज यांच्या भूमिकेत अमोल जैन होते. यासोबतच संयोजकांकडून साखर वाटण्यात आली. तसेच शिवकालीन पारंपरिक कलाप्रकार, तलवारबाजी, भाला आदींचा समावेश होता. सातारा येथील मर्दानी खेळ, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळी येथील मल्लखांब, फायर शो, हलगी पथक, केरळ येथील पारंपरिक वाद्य, बंजारा नृत्य, नांदेड येथील पंचशील माध्यमिक शाळेतील लेझीमपथक अशा अनेक कला प्रकारांचा या जयंती महोत्सवात सहभाग होता. महात्मा फुले पुतळा आणि शाहू महाराज यांच्या पुतळ्याजवळ फटाक्यांची आतीषबाजी करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य इंजि. प्रसेनजीत मांजरमकर, कुलदीप नंदूरकर, अभिनेते दिनेश कवडे, नकुल जैन, कुवरचंद मंडले, कमलाकर बिरादार, जयपाल सावंत, मदनपाल बनसोडे यांनी परिश्रम घेतले. या भव्य मिरवणुकीतील देखावे पाहण्यासाठी नांदेडकरांनी एकच गर्दी केली होती.

### समाजप्रबोधनाचे काम उल्लेखनीय - सामाजिक न्यायमंत्री सिरसाठ

फुले-शाहू-आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष इंजि. प्रवीण खंदारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नांदेडमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची अनोखी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. दक्षिणेतून ढोल-ताशा वाद्य, ऊंट, २० घोडे, हत्ती अशा पारंपरिक पद्धतीने जयंती साजरी केली. या उपक्रमामुळे समाजप्रबोधनाचे प्रभावी काम झाले आहे, हे अतिशय उल्लेखनीय आहे. सामाजिक सलोखा स्थापन करण्याच्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल आहे. मला या जयंती महोत्सवाचे निमंत्रण होते, परंतु राजकीय कामामुळे येता आले नाही. या त्यांच्या कार्याला मनापासून शुभेच्छा देतो. तसेच नांदेडच्या सर्व जनतेला जयंतीनिमित्त शुभेच्छा देतो, अशा भावना व्यक्त करीत राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी इंजि. प्रवीण खंदारे यांच्या जयंती महोत्सव उपक्रमाचे कौतुक केले.

# टीईटी घोटाळ्याच्या निषेधार्थ काँग्रेसचे बोंबाबोंब आंदोलन




**नांदेड (प्रतिनिधी)** – नीट पाठोपाठ रविवारी होणारा शिक्षक भरती परीक्षेचा टीईटीचा पेपर देखील फुटला आहे. त्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या निषेधार्थ खा. रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात आणि उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या नेतृत्वात शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शनिवार, दि.२७ जून रोजी आयटीआय चौक येथे बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.

नीट पाठोपाठ टीईटीचा पेपर फुटला आहे. वारंवार पेपर फुटीतून सरकारचे अपयश अधोरेखित होत आहे. यातून परीक्षार्थींचे वर्ष किंबहुना आयुष्य बरबाद होत असल्याचा आरोप जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी केला.

यावेळी सरकार विरुद्ध बोंबा मारुन निषेध करण्यात आला. यावेळी डॉ. श्रावण रॅपनवाड, सुरेंद्र घोडजकर, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, नागराज सुलगेकर, कुमार कुर्तडीकर, सुरेश हाटकर, गगन यादव, शंकर शिंदे, बापूसाहेब पाटील, संजय वाघमारे, अक्षय नळगे, गणेश कोकाटे, सजेतसिंग ढिल्ले, प्रवीण कानघुले, अमरजितसिंग बुटर, रवी कल्याणकार, ज्योती कदम, जेशिका शिंदे, सुरेखा वैद्य, किरण पडलवार, तुषार देशमुख, अझर शेख, प्रसेनजित वाघमारे, सचिन टाले, गजानन जाधव, प्रकाश दिपके, प्रबुद्ध चित्ते, संजय कौठेकर, कलिम शेख, गौतम सिरसाट, शेख नईम आदींसह इतर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौ. निलाबाई लांडगे यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सामाजिक कार्यकर्ते तथा नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे (६५) यांच्या मातोश्री ज्येष्ठ महिला नागरीक सौ. निलाबाई हिरामण लांडगे यांचे २६ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, नातू, पणतू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर २७ जून रोजी सिडको येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## प्रभाग १६ मध्ये पूर्ववत कचरा संकलन सुरू

### प्रा. डॉ. कैलास यादव यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश



**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १६ मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेली घरपोच कचरा संकलन सेवा अखेर पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या सेवेसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रा. कैलाश भानुदास यादव यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले.

यापूर्वी घरपोच कचरा संकलन व्यवस्था बंद असल्यामुळे अनेक गल्ल्यांमध्ये कचऱ्याचे ढीग साचत होते. नाल्या तुंबणे, दुर्गंधी पसरणे आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. आता हातरिक्षांद्वारे नियमित घरपोच कचरा संकलन सुरू झाल्याने ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होत असून, परिसर अधिक स्वच्छ होत असल्याचे चित्र दिसत आहे.

या उपक्रमासाठी नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करून देण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते गोकुळ यादव यांनी संपूर्ण प्रभागात जाऊन जनजागृती केली. तसेच स्वच्छता अभियानात नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला. ही सेवा पुन्हा सुरू झाल्याबद्दल प्रभागातील नागरिकांनी नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त, उपायुक्तांसोबतच उपमहापौर दीपक रावत आणि नगरसेवक तुलजेश यादव यांचे विशेष आभार मानले. नागरिकांच्या मते या उपक्रमामुळे स्वच्छ नांदेड, सुंदर नांदेड या संकल्पनेला निश्चितच बळ मिळणार आहे.

# वाळूमाफियांवरील कारवाईत १८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड ग्रामीण व लिंबगाव पोलिसांनी वाळूमाफियांवर २ ठिकाणी वेगवेगळी कारवाई केली. यात जवळपास १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी ३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार दि. २६ जून रोजी पेट्रोलिंग दरम्यान मारुती मंदिराजवळ असर्जन येथे गाठून तपासणी केली. यात (एमएच २४ जे ६०६४) व (एमएच ०४ एफपी १४५२) या दोन्ही टेम्पोमध्ये अवैधरित्या नेण्यात येणारी वाळू जप्त करण्यात आली.

याप्रकरणी आरोपी युवराज अंबादास जाधव रा. गोवर्धनघाट याच्यासह अनोळखी चालक व मालक अशा तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत ६ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत हवालदार राजू जिंकूट, अंमलदार जाधव, अवातीरक यांनी सहभाग घेतला.

तर दुसरी कारवाई लिंबगाव ठाण्याचे सपोनी पंढरीनाथ बोधनकर यांच्या पथकाने केली. नाळेश्वर ते सुगाव रस्त्यावरील वोरगाव तेलंग पाटीजवळ वाळू चोरट्यांना पकडले. या कारवाईत (एमएच १२ एव्ही ७८५९) क्रमांकाचा टिप्पर ३ ब्रास काळी वाळू असा १२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी बालाजी कामाजी पिसाळ राहणार कावलगाव ता. पूर्णा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत हवालदार काजी, गर्दनमारे, रितेश टाक यांनी सहभाग घेतला.

# नांदेड लॉयन्स क्लब अध्यक्षपदी भारतीया, सचिवपदी खान तर कोषाध्यक्षपदी जांगीड



**नांदेड (प्रतिनिधी)**– लायन्स इंटरनॅशनल, डिस्ट्रीक्ट ३२३४ क्र-२ अंतर्गत लायन्स क्लब नांदेडचा ६२ वा पदग्रहण सोहळा गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी सांय. ७:३० वाजता पंजाबी रेस्टॉ., फुकेट, थायलंड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात लायन्स वर्ष २०२६-२७ साठी नवनिर्वाचित पदधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला. लॉ. महेश भारतीया यांनी अध्यक्षपदाची, लॉ. सरवर खान यांनी सचिवपदाची आणि लॉ. बाबुलाल जांगीड यांनी खजिनदारपदाची सूत्रे हाती घेतली. कार्यक्रमाचे शपथग्रहण अधिकारी म्हणून पीडीजी एमजेएफ लॉ. नारायणलाल कलंत्री यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शपथ देऊन त्यांच्या कार्याची जबाबदारी समजावून सांगितली.

यावेळी रिजन चेअरपर्सन लॉ. सुरभी माहेश्वरी, झोन चेअरपर्सन लॉ. डॉ. ज्योती जांगीड, क्लबचे मावळते अध्यक्ष लॉ. संतोष देवसरकर, तसेच माजी अध्यक्ष व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष लॉ. महेश भारतीया यांनी यावेळी बोलताना वन फॉर ऑल, ऑल फॉर वन या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत सामाजिक बांधीलकी जोपासून आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि सेवा क्षेत्रात भरीव कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजना-बद्दल लायन्स क्लब नांदेडच्या सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# घरफोडी करणारे चोरटे मुद्देमालासह एलसीबीच्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात घरफोडीच्या गुन्ह्यात सक्रिय असलेल्या चोरट्यांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार साईनाथ पुयड यांच्या पथकाने अटक केली. या चोरट्यांकडून तब्बल ७१ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त केली आहे. हे मागील काही दिवसांपासून घरफोड्या करून फरार होते.

शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील अंमलदार हे नांदेड शहरातील शंकरराव चव्हाण चौक बायपास रोड परिसरात असताना त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी बोंढारकडे जाणाऱ्या रोडवर इरफान यांचे टायर वर्क्स दुकानाजवळ सापळा रचून छापा मारला असता शेख रेहान ऊर्फ चिल्ला शेख महेबुब (वय २१ वर्षे रा. मिलतनगर गल्ली नंबर ३ नांदेड) आणि मोहम्मद रेहान ऊर्फ रिझवान ऊर्फ पुष्पा मोहम्मद ईलियास (वय २० वर्षे रा. मिलतनगर गल्ली नंबर ७ नांदेड) यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांच्या अंगझडतीमध्ये सोन्या-चांदीचे दागिने व नगदी रकमेच्या मुद्देमालासह त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्यांनी त्याच्या ईतर एका साथिदारासह काही दिवसांपूर्वी मेहबुबनगर व ओंकारेश्वर नगर असे दोन ठिकाणी बंद घराचे कडीकोंडा तोडून घरातील कपाटामधील सोन्या-चांदीचे दागिने व नगदी रुपये चोरी केले होते व दोन्ही ठिकाणचे चोरी केलेले सोने-चांदी चे दागिने आम्ही आज रोजी विक्री करुन पैसा आपसात वाटून घेणार होतो असे सांगून वरील दोन्ही ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपीतांना जप्त मुद्देमालासह पुढील तपास कामी पोलीस स्टेशन विमानतळ यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# लोहा शहरात सायाळ रोडवरील अतिक्रमण हटविले; ५६ मालमत्ताधारकांना नोटीस



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा शहराचे नगराध्यक्ष म्हणून कारभार हाती घेतल्यानंतर नगराध्यक्ष शरद पवार व टीमने गेल्या सहा महिन्यांपासून कामाचा धडाका सुरू केला आहे. जुन्या शहरात जाणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून रोड प्रशस्त केला. हीच कामाची गती कायम ठेवत ४० वर्षांपूर्वी झालेल्या सायाळ रोडवरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम नगरपालिकेने हाती घेतली आहे. ५६ मालमत्ताधारकांना नोटीस बजावल्या तसेच न्यायालयात कव्हेट दाखल केले होते, पण या भागातील नागरिकांचे नगरपालिकेला सहकार्य मिळत आहे त्यामुळे हा रोड प्रशस्त होणार आहे.नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख व टीमने घेतलेला हा धाडसी निर्णय शहरासाठी दीर्घकालीन उपयुक्त ठरणार आहे

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष शरद पवार व उपनगराध्यक्ष करीम शेख व टीम यांनी स्वच्छता तसेच हरित शहर मोहीम हाती घेतली, शिवाय भविष्याचा विचार करत वाढत्या शहरासाठी प्रशस्त रस्ते निर्मितीवर भर देत आहेत. नगराध्यक्ष शरद पवार यांच्या काळात रस्ते तयार होत आहेत.

### ५६ मालमत्ताधारकांना नोटीस

सायाळ रोड परिसरात राहणाऱ्या व रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या ५६ जणांना नगरपरिषदेने नोटीसा बाजवल्या. त्यांत अतिक्रमण काढण्यास सुरुवात झाली आहे. कोर्टात कव्हेट दाखल करण्यात आले होते. या भागाचे नगरसेवक सदा वडजे, मारुती जंगले यांनी माजी नगराध्यक्ष यांच्या भावाचा पराभव केला. त्याच्या विरोधात खुद्द राज्याचे माजी मुख्यमंत्री यांनी कॉर्नर सभा घेतली होती. उपनगराध्यक्ष करीम शेख व टीमचा धाडसी निर्णय उपयुक्त ठरणार आहे.

### बसस्थानकामागे प्रशस्त रस्ता

लोहा बसस्थानकाजवळून प्रियदर्शनी नगर, इंदिरा नगर भागाकडे जाणारा रस्ता तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांची सोय झाली.

लोहा शहरातील सायाळ -मुख्य चौक -जायकवाडी वसाहत -जुना लोहा -बेनाळ असा १९८१-८२ या काळात तत्कालीन कंधार पंचायत समितीचे सभापती व्यंकटराव मुकदम यांच्या काळात रोजगार हमी योजनेतून झाला होता. त्याच काळात मजुरांना कोपन दुकानावर सोसायटी लुगडी सुद्धा मिळत असत. ब्रासीवर काम केले जात असे. जुन्या शहरात पोचीमायपर्यंत रस्ता आला पुढे बेनाळकडे जाताना तो शेतकऱ्यांनी अडविला. जर त्या काळात हा रस्ता झाला असता तर आता शेतीला प्रचंड भाव आला असता, असे आता बोलले जाते.

# आधी स्वत:चे घर सांभाळा, नंतर इतरांची काळजी करा!

### आ. राजूरकर यांचा आ. रोहित पवार यांना टोला

**नांदेड (प्रतिनिधी)**– खा. अशोकराव चव्हाण हे राज्याचे नेते होते, आहेत व राहतील, यात तीळमात्र शंका नाही. त्यांचा सन्मान व त्यांना न्याय देण्याचा विषय भाजप श्रेष्ठी पाहतील. परंतु तुम्ही ज्या पक्षात आहात त्या पक्षाचे व महाविकास आघाडीचे तीनतेरा वाजले आहेत. नेते पक्ष सोडत आहेत. भविष्यात तुमचा पक्ष दुर्बीण लावूनही सापडणार नाही, अशा वेळी अशोकराव चव्हाण व भाजपवर टीका करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्याचा प्रकार आहे, असे भाष्य करत आ. अमरनाथ राजूरकर यांनी आ. रोहित पवार यांना चांगलेच फैलावर घेतले आहे.

शेतकऱ्यांचा कळवळा असल्याचा आभास निर्माण करत पक्ष वाचविण्याच्या धडपडीत राज्यभर फिरणाऱ्या आ. रोहित पवार यांनी नांदेडमध्ये येऊन नको त्या गोष्टीत नाक खुपसले व खा. अशोकराव चव्हाण यांच्या राजकीय कारकीर्दीवर भाष्य केले. त्याला उत्तर देताना आ. राजूरकरांनी खा. अशोकराव चव्हाण यांच्या कारकीर्दीचा आढावा मांडला.

२००९ च्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीत त्यांच्याच नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने विधानसभेत ६२ वरून ८२ व अपक्षांसह १०० आमदार तर लोकसभेत ६ वरून १७ खासदार, अशी मजल मारली होती. त्यांचे नेतृत्व व कर्तृत्व पाहून आपले आजोबा खा. शरद पवार हे सुद्धा आचंबित झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा. अशोकराव चव्हाण यांच्यासोबत चर्चेस बसण्यास घाबरत होते, अशी आठवण आ. राजूरकर यांनी आ. पवार यांना करून दिली. २००९ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला राज्यात एवढा प्रचंड विजय मिळवून दिल्यानंतर या पक्षाने अशोकरावांना कोणता न्याय दिला. त्यांना मुख्यमंत्री पदावरून केवळ एका वर्षात पायउतार व्हावे लागले. त्यावेळेस तुमचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मूग गिळून का गप्प बसला होता. कदाचित तुमच्या पक्षातील नेत्यांनी केलेले वेगवेगळे भ्रष्टाचार उघड होण्याची त्यांना भीती होती का, असा सवाल आ. राजूरकर यांनी केला आहे.

खा. अशोकराव चव्हाण हे निष्कलंक चारित्र्याचे धनी असल्यामुळे त्यांनी न्यायालयीन लढाई लढून आपले निर्दोषत्व सिद्ध केल्यानंतरही काँग्रेस पक्षाने त्यांना अडगळीत टाकण्याचे काम केले. राज्याचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांविषयी असलेली ही आकसबुद्धी या विषयी भाष्य करण्याऐवजी भाजपने खा. अशोकराव चव्हाण यांचे काय केले, असा बाळबोध प्रश्न करण्याचा तुम्हाला अधिकार काय, असा सवाल केला.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com